# प्रकरण दुसरे

## संबंधित साहित्याचा अभ्यास

२.१ प्रास्ताविक

२.२ संबंधित साहित्याचा अभ्यास

२.३ संबंधित संशोधनाचा अभ्यास

२.४ समारोप

संदर्भ

# प्रकरण दुसरे
# संबंधित साहित्याचा अभ्यास

## २.१ प्रास्ताविक : -

मागील प्रकरणात संशोधनाचा विषय, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा या बाबी दिल्या आहेत. प्रस्तुत संशोधनासारखी जी संशोधने झालेली आहेत अशा कांहीं संशोधनाची माहिती अभ्यासकाने या प्रकरणात दिली आहे.

या संबंधित संशोधन साहित्याचा शोध घेण्याचे हेतू पुढील प्रमाणे होत - पुर्वी झालेल्या संशोधनाची नक्कल होऊ नये, संशोधकाला त्यावरून कांहीं नवीन कल्पना, युक्ती लक्षात यावी, संशोधनाची दिशा ठरविण्यास उपयुक्त ठरावे, संशोधकाला संशोधनाची कार्यवाही निश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरावे.

## २.२ संबंधित साहित्याचा अभ्यास :-

संबंधित संशोधनाचे समालोचन करण्यासाठी अभ्यासकाने पुढील शैक्षणिक संदर्भ ग्रंथाचा अभ्यास केला.

i) <u>A Survey of Research in Education :-</u>

M.B.Buch Center of advanced Study in Education, Faculty of Education and Psychology, Maharaja Sayajirao University of Baroda, Baroda ( India ) 1974.

ii) <u>Second Servey of Research in Education ( 1972 - 1978 )</u>

M.B.Buch Society for Educational Research and Development Baroda, ( India ) 1979.

iii) <u>Third Survey of Research in Education ( 1978 - 1983 )</u>

M.B.Buch National Council of Educational Research and Training, Delhi 1986.

iv) <u>Fourth Survey of Research in Education (1983 - 1988 ) Volume I</u>

M.B.Buch National Council Of Educational Research and Training, Delhi 1991.

V) Fourth Survey of Research in Education ( 1983 - 88 ) Volume II
M.B.Buch National Council of Educational Research and Training, Delhi 1991.

VI) Educational Investigations in Indian Universities ( 1939 - 1961 )
National Council of Educational Research and Training, Delhi 1966.

VII) Second National Survey of Secondary Teacher Education in India
B.N.Pandey, National Counciul of Educational Research and Training, Delhi 1969.

VIII) Educational Research in Universities in Maharashtra
N. K.Patole. Platinum Jubilee Publication, Bombay 1982.

IX) University News :- Sutinder Singh. A weekly Journal of Higher Education by Association of Indian Universities 1995.

X)शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे :- रा.शं.मुळे,वि.तु.उमाठे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७७.

११)सामाजिक संशोधन :- प्रा. सुशिला ओडेयर, अजब पुस्तकालय, कोल्हापूर १९८१

१२)सामाजिक संशोधन पद्धती :- डॉ. पु. ल. भांडारकर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर १९८७.

१३) संशोधन - पद्धती, प्रक्रिया व अंतरंग : - डॉ. दु. का. संत, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे १९८८.

१४) समाजशास्त्रीय संशोधन - तत्वे व पद्धती :- प्रा. रा.ना.घाटोळे. श्री मंगेश प्रकाशन, नागपूर १९८८.

१५) शैक्षणिक संशोधन पद्धती : - डॉ. वि. रा. भिंताडे, नूतन प्रकाशन पुणे १९८९.

## २.३ संबंधित संशोधनाचा अभ्यास : -

संशोधकाने ज्या संबंधित संशोधनाचा अभ्यास केला ती संबंधित संशोधने खालील प्रमाणे आहेत.

i) Bose P.K., Banerjee P.P.and Mukherjee S.P. " Case study of seven big Colleges in Calcutta - Their Academic, Administrative and financial Affairs " Department of statistics, Calcutta University, 1973.

संशोधनाचे उद्दिष्ट :

कलकत्यातील सात मोठ्या महाविद्यालयातील शैक्षणिक, आर्थिक तसेच प्रशासकीय व्यवस्थेचे परीक्षण करणे.

संशोधनाची कार्यपद्धती : -

आशुतोष, बंगबाशी, चारुचंद्र, सिटी, महाराजा मणिंद्रचंद्र, सुरेंद्रनाथ आणि विद्यासागर या सात महाविद्यालयाच्या १९५९ - १९६० या वर्षापासून निरनिराळ्या वर्षातील शैक्षणिक, प्रशासकीय, आर्थिक, पैलूंचे परीक्षण केले. यापैकी सहा महाविद्यालय विश्वस्त संस्थेकडून व एक महाविद्यालय खाजगी संस्थेकडून चालवले जात होते

निष्कर्ष :-

१. या सर्व महाविद्यालयामध्ये बहुतांशी उत्पन्न, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाच्या पगारावर खर्च केले जात होते.

२. या महाविद्यालयांना इमारतीची व्यवस्था, फर्निचर, ग्रंथालय, प्रयोगशाळा यासाठी फारच कमी खर्च करता येत होता त्यामुळे प्रयोग शाळेतील नमुने व साहित्य अपुरे होते. इमारत, ग्रंथालय, प्रयोगशाळा यांच्या विकासासाठी शासकीय अनुदानावर अवलंबून रहावे लागत होते. शासकीय अनुदानाचा वाटा या सातही महाविद्यालयामध्ये विचार करण्यासारखा होता.

३. कांहीं थोड्या महाविद्यालयामध्ये शिक्षककल्याणनिधी, क्रिडांगण विकास निधी शासकीय उत्पन्नातून उभा करावा लागत होता.

४. शास्त्र प्रयोगशाळेवरील खर्च अपुरा होता. ग्रंथालयातील पुस्तकावरील खर्चही अपुरा होता.

५. विशिष्ट विषयावरील दररोजची व्याख्याने कमी होती.

६.कर्मचाऱ्यांना या सात महाविद्यालयामध्ये सर्वसामान्य सुविधा विषयी सहकार्य असावे असे वाटते.

७. अशासकीय महाविद्यालयामधील शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा पगार अपुरा होता.

८. शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी मूळ पगारानुसार नव्हता. ———————— १

ii) MOHANA R.
**" Case Studies of Innovative Institutions " Ph.D. Education, Maharaja sayajirao University, Baroda, 1983.**

संशोधनाची उद्दिष्टे :-

१. नवोपक्रमीत माध्यमिक शाळांच्या व्यक्तीअभ्यासाची योजना तयार करणे.
२. नवोपक्रमीत व अनवोपक्रमीत माध्यमिक शाळातील फरक शोधणे.
३. नवोपक्रमीत माध्यमिक शाळा - शाळामधील फरकांचे पैलू शोधणे.
४. नवोपक्रमशिलतेला व अनवोपक्रमशिलतेला कारणीभूत ठरणारे माध्यमिक शाळांचे घटक शोधणे.
५. प्रत्येक नवोपक्रमीत शाळेतील अवलंबिलेल्या नवोपक्रमतेचा अभ्यास करणे.

संशोधनाचे स्वरूप :- या संशोधनामध्ये खालील गोष्टींचा समावेश होता
१. नवोपक्रम शाळेतील भौतिक सुविधांच्या गुणात्मक वैशिष्ट्यांचे वर्णन, सेवकांची व्यवसायिक व शैक्षणिक रचना, विद्यार्थी - शिक्षक प्रमाण आणि इतर वैशिष्ट्ये पाहणे.
२. त्यांनी अवलंबिलेल्या नवोपक्रम पद्धतीचे वर्णन करणे.
३. नवोपक्रमाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींची यादी करणे.
४. विविध क्षेत्रात अवलंबलेल्या नवोपक्रमाची माहिती घेणे.
५. या माध्यमिक शाळातील तीन वर्षापेक्षा जास्त काळातील माध्यमिक शालान्त परीक्षामधील विद्यार्थ्यांच्या निकालाची नोंद घेणे.
६. शाखा सभासदांच्या नवबदलांचे मूल्यमापन करणे.
७. शाखा प्रमुखांच्या नेतृत्वगुणांचे मूल्यमापन करणे.
८. शाळांच्या व्यवस्थापकीय वातावरणाचे मूल्यमापन करणे.

संशोधनाची कार्यपद्धती :-

मद्रास शहरांतील स्वप्रयोजन न्यादर्शन या पद्धतीने निवडलेल्या नऊ माध्यमिक शाळांचा अभ्यास केला. संशोधकाने खालील संशोधन साधनांचा उपयोग केला.
१. नवोपक्रमशिलता सूची.
२. शाळेच्या माहितीसाठी प्रश्नावली.
३. अवलंबलेल्या नवोपक्रमांची प्रश्नावली.
४. नवोपक्रमामध्ये येत असलेल्या ४५ समस्यांची पडताळासूची.
५. नवोपक्रमाची अंमलबजावणी करण्यासंबंधी मुख्याध्यापकांना मुलाखतसूची.

संशोधनासाठी वापरलेली इतर साधने : -

१. मिलरचे चेंज प्रोनिनेस इनव्हेंटरीची भाषांतरीत प्रत.
२. हेमफिल आणि कुन्स यांनी विकसीत केलेली नेतृत्व वर्तनाची प्रश्नावली.
३. हाल्पीन आणि क्रॉफ्ट यांनी विकसीत केलेली व्यवस्थापकीय वातावरणाचे वर्णन करणारी प्रश्नावली.

ही साधने वापरून या निवडक शाळांचा व्यक्ति अभ्यास केला. शालेय दप्तरातून आणि अलिप्त निरीक्षणातून माहिती गोळा केली या माहितीचे संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या पृथःकरण केले.

निष्कर्ष :-

१. समर्पित मुख्याध्यापक, संस्थाचालकांचे लक्ष घालून केलेले पर्यवेक्षण, अनुकूल परंपरा, नवोपक्रमाच्या नियोजनामध्ये व अंमलबजावणीमध्ये स्वायत्तता हे महत्वाचे घटक अनुकूल परिणामासाठी कारणीभूत होते.
२. संस्थेचे पदाधिकारी नवोदय उपक्रमासाठी यशस्वी नेतृत्व आणि प्रेरणा देवू शकले.
३. संस्थेच्या पदाधिकारी वर्गाची बदलती अनुकूल भूमिका ही नवोपक्रम राबविण्यासाठी उपयोगी पडली.
४. या नवोपक्रमात आलेले यश हे कार्यक्रम सुधारण्यासाठी व पुनर्भरणासाठी उपयोगी ठरले.
५. नवोपक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी विरोध वाटला नाही.
६. नवोपक्रम राबविण्यामध्ये खालील विश्वव्यापक अडथळे आढळून आले. उदा- बोजड अभ्यासक्रम, परीक्षाधिष्ठीत शिक्षण पद्धती, वेळेचा अभाव.
७. नवोपक्रम शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्राविण्यता उच्च दर्जाची आढळली.
८. नवोपक्रमीत शाळांच्या मुख्याध्यापकांचे नेतृत्ववर्तन उच्च प्रतीचे होते
९. नवोपक्रमशाळातील व्यवस्थापकीय वातावरण स्पष्ट व खुले होते.
१०. नवोपक्रम शाळांमध्ये उच्च प्रतीचे बदल दिसून आले. - - - - - - - - २.

iii) SALUNKHE D. D.

Marketing of Educational Services : -
" A Case Study of Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli, Maharashtra " Ph. D. Commerce, Shivaji University 1980.

संशोधनाची उद्दिष्टे : -

१. कृषीविद्यापिठाच्या उद्दिष्टानुसार विद्यापिठाच्या कामकाजाचा अभ्यास करणे.
२. विद्यापिठाच्या यंत्रणेच्या विभागणीचा अभ्यास करून ही यंत्रणा उत्पादन व सेवा याबाबत कितपत यशस्वी झालेली आहे याचा अभ्यास करणे.
३. विद्यापिठाच्या निर्मिती व सेवेबाबत ग्राहकांची मते, अनुभव आणि अपेक्षा यांचा अभ्यास करणे.
४. विद्यापिठाच्या यशस्वी उत्पादनाच्या व सेवेच्या विभागणीसंबंधी एक नमुना विकसित करणे

संशोधनाची कार्यपद्धती : -

कोकण विद्यापिठाच्या अधिकार क्षेत्रामध्ये महाराष्ट्रातील पाच जिल्हे येतात. बहुस्तरीय न्यादर्शन नमुना निवड पद्धतीने ४ जिल्ह्यातील, ३२ तालुक्यातील ५२ गावांमधून ३५० शेतकरी लोकांची निवड केली.

निवड केलेल्या शेतकरी वर्गाकडून संरचित मुलाखतीद्वारे माहिती गोळा केली विद्यापिठाच्या प्रकाशित व अप्रकाशित साहित्याद्वारे ही माहिती गोळा केली. तसेच संस्थाना भेटी व निरीक्षणे, तसेच विद्यापीठातील कृषी शास्त्रज्ञांशी चर्चा करून माहिती गोळा केली. साध्या शेकडेवारीने माहितीचे वर्गीकरण केले.

मुख्य निष्कर्ष : -

१. शेतकरी वर्गांची कमी प्रतीची सामाजिक व आर्थिक परिस्थिती, अज्ञान, गरीबीमुळे शेतीचे उत्पन्न कमी येते, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत नाहीं.
२. बहुसंख्य शेतकरी लोकाना ( ७५ टक्के ) विद्यापिठाच्या अस्तित्वाची व कार्याची जाणीव नाहीं.
३. जे शेतकरी विद्यापीठ आणि त्याच्या कार्याविषयी जागृत आहेत ( ८० टक्के ) ते विद्यापिठाच्या सेवेचा लाभ घेतात.
४. विद्यापीठ अंतर्गत प्रशिक्षणावर भर देते पण बाह्यप्रशिक्षण उदा : बाजारपेठे विषयी प्रशिक्षण देत नाहीं. वास्तविक हे प्रशिक्षण कृषी विद्यापीठासाठी आदर्श ठरावे.— ३

IV)यादव के. के. : -

' सामाजिक शिक्षणासाठी कै. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी केलेल्या प्रयत्नांचा चिकित्सक अभ्यास ' एम्. फिल. शिवाजी विद्यापीठ, १९८८.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१. स्त्री शिक्षण विषयक दृष्टीकोन बदलण्याबाबत कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
२. विधवा व परित्यक्ता यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
३. अंधश्रद्धा व जातीनिर्मूलन करण्यासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.
४. मुलांचा आहार व व्यायाम याबाबतचा दृष्टीकोन अभ्यासणे.
५. मुलांमध्ये नेतृत्वगुण, सभाधीटपणा, श्रम करण्याची वृत्ती इ. गुण अंगी बाळगण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
६. शेतकरी लोकांमध्ये केलेल्या जागृतीचा अभ्यास करणे.
७. विद्यार्थ्यांच्या अर्थार्जनासाठी सुरू केलेल्या व्यवसायाचा अभ्यास करणे.

संशोधनाची कार्यपद्धती : -

संशोधनाच्या सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून माहिती मिळविली. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळातील २५ सदस्य, २५ समाजसेवक, २५ सर्वसामान्य नागरीक आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळातील ५० कर्मचारी अशा एकूण १२५ जणांची प्रश्नावलीसाठी निवड केली. त्यातील ७८ प्रश्नावल्या भरून मिळाल्या. संरचित मुलाखतीद्वारे २० मुलाखती घेतल्या. त्यात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळातील ५ सदस्य, १० प्राध्यापक / शिक्षक, ३ प्राचार्य,२ सर्वसामान्य नागरीक, यांचा समावेश होता. तसेच शाखांना प्रत्यक्ष भेटी देवून माहिती मिळवली. कर्मवीर मामासाहेबांच्या जीवनावरील सर्व प्रकाशित साहित्याचा अभ्यास करून माहीती मिळवली. विविध विषयावरील मामांच्या मुलाखती ध्वनीमुद्रीत स्वरूपात उपलब्ध होत्या, त्या ध्वनीफितीचा अभ्यास करून माहिती मिळवली

निष्कर्ष : -

१. स्त्री शिक्षणास मामासाहेब अत्यंत महत्व देत. मुलींच्या राहण्याजेवणाची सोय करणे अत्यंत महत्वाचे आहे. मुलींच्या शिक्षणाबाबतचा पालकांचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे.

२. विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्या बद्दल मामांना आदर होता. मामांनी त्यांची वसतीगृहात जेवणाची मोफत सोय केली नाही. त्यांना काम दिले व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली.
३. विधवांनी विवाह करावा पण जर मुले असतील तर विवाह न करता मुलांचे व्यवस्थित संगोपन करावे.
४. जातीभेद वर्णव्यवस्था, व अनिष्ठ रूढी मामांना मान्य नव्हत्या. कमी खर्चातील विवाहास प्रोत्साहन दिले.
५. वसतीगृहात साधा पण चौरस आहार असे. व्यायामाबाबत वसतीगृहात सक्ती असे. नेतृत्व गुण व श्रमनिष्ठा वाढीसाठी वसतीगृहात खास प्रयत्न केले जात.
६. कर्मवीर मामासाहेबांच्या वसतीगृहात दररोज शारीरिक कष्ट किमान अर्धा तास तरी करावे लागत.
७. मजूर, गवंडी व पाथ्रुड अशा लोकांचा मंत्र्याचे हस्ते सत्कार करून श्रम प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला जाई.
८. शेतकरी वर्गावरील अन्याय दूर करण्यासाठी मामांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती केली.
९. ज्याच्या जवळ सुदृढ शरीर आहे व ज्याची काम करण्याची व शिकण्याची इच्छा आहे अशा विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली पाहिजे असे त्यांचे मत होते.
१०. गरीब विद्यार्थ्यांना अर्थार्जन करण्यासाठी विविध व्यवसाय सुरूकरून त्यांना काम दिले.
११. विद्यापीठ वर्तुळात मामा एक शिक्षणतज्ज्ञ होते. ———— ४.

## २.४ समारोप : -

संशोधकाने वरील सर्व संबंधित संशोधनांचा अभ्यास केला. ही संबंधित संशोधने सशोधनाची दिशा ठरविण्यासाठी उपयुक्त ठरली.

संशोधनाची कार्यवाही करण्यासाठी संबंधित संशोधनाचा हा अभ्यास उपयुक्त ठरला. संशोधकाने संशोधनाची दिशा निश्चित करून, संबंधित संशोधन साहित्याच्या अभ्यासावरून प्रस्तुत संशोधनाची कार्यपद्धती निश्चित केली. संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी कोणती कार्यपद्धती वापरली व माहिती संकलीत करण्यासाठी संशोधनाच्या कोणत्या साधनांचा वापर केला ते पुढील प्रकरणात दिले आहे.

# संदर्भ

1) P. K. Bose, P.P. Banerjee, and S.P. Mukherjee. :- Cited by M.B. Buch. Third Survey of Research in Education, Delhi. National Council of Educational Research and Training 1987 . Page 875.

2) R. Mohana. :- Cited by M. B. Buch Fourth Survey of Research in Education , Volume II Delhi, National Council of Educational Research and Training. 1991 Page 1098.

3) D. D. Salunkhe. :- Cited by M. B. Buch. Fourth Survey of Research in Education . Volume II I bid page 1116.

4) के. के. यादव सामाजिक शिक्षणासाठी कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी केलेल्या प्रयत्नांचा चिकित्सक अभ्यास , एम्. फिल शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर, १९८८.